सो. स्थापनाः सन् 1928

सो. रजि. क्र.1308/1958-59

बृहन्महाराष्ट्र मंडळ
(मध्यवर्ती संघटना, नवी दिल्ली)

दिलीप कुंभोजकर
प्रधान कार्यवाह

दिनांक 02/11/2021
मु. : जबलपूर

# वार्षिक सर्वसाधारण सभा, शनिवार दिनांक 29 जानेवारी 2022
## बैठक सूचना

प्रति,

**सन्माननीय सभासदगण ,**
**(संरक्षक /आजीवन /संस्थागत सभासद)**
**बृहन्महाराष्ट्र मंडळ, नवी दिल्ली**

**विषय : वार्षिक सर्व साधारण सभा सूचना व विषयसूची**

सर्व संरक्षक, आजीवन आणि संस्थागत सभासद सभासदांना एतद्द्वारे सूचित करण्यात येत आहे की बृहन्महाराष्ट्र मंडळ, नवी दिल्लीची वार्षिक सर्वसाधारण सभा, खाली कार्यसूचीत नमूद केलेल्या विषयांवर चर्चा व निर्णय करण्या करिता **शनिवार, दिनांक 29 जानेवारी 2022, दुपारी 03:00 वाजता, 71 वे अधिवेशन च्या नियोजित स्थळी, एमराल्ड हाइट्स इंटरनेशनल स्कूल, ए.बी.रोड, आकाशवाणी समोर राऊ, जि. इंदौर (म.प्र.) पिनकोड** 453331 येथे आयोजित केली गेली आहे. ह्या बैठकीस आपली सर्वांची उपस्थिती प्रार्थनीय आहे.

**सभेची विषयसूची**

1. पोर्ट ब्लेअर (अंदमान) येथे दिनांक 10/01/2020 रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या कार्यवृताचे वाचन व पुष्टी
2. सांप्रत कार्यकारिणीचा पोर्ट ब्लेअर (अंदमान) अधिवेशन अर्थात 11 जानेवारी 2020 पासून आता पर्यंतच्या मंडळाच्या विभिन्न गतिविधींवर आणि वाटचाली वर प्रधान कार्यवाह च्या अहवालाचे वाचन व पुष्टी
3. वर्ष 2021 मध्ये कोरोना परिस्थिती मुळे वार्षिक साधारण सभा आयोजित करता आली नाही तरी या कालावधीत कार्यकारिणी ने घेतलेल्या महत्वपूर्ण निर्णयांस कार्योत्तर स्वीकृती.
4. कोषाध्यक्ष द्वारे आर्थिक वर्ष 2019-2020 आणि आर्थिक वर्ष 2020-2021 चे अंकेक्षित आर्थिक विवरण (आय व्यय पत्रक व आर्थिक स्थिती विवरण ) प्रस्तुती व त्यास स्वीकृती
5. वर्ष 2021-2022 च्या अंदाजपत्रकास कार्योत्तर स्वीकृती आणि 2022-2023 चे अंदाजपत्रक(बजेट) ची कोषाध्यक्ष द्वारे प्रस्तुती व त्यास स्वीकृती
6. आर्थिक वर्ष 2020-2021साठी सनदी लेखापालच्या नियुक्तीस कार्योत्तर स्वीकृती आणि आर्थिक वर्ष 2021-2022 व 2022 - 2023 साठी सनदी लेखापालची नियुक्ती
7. सभासदां कडून पूर्वप्राप्त प्रश्न व सूचना यावर उत्तरं
8. अध्यक्षांच्या परवानगीने अन्य प्रस्तावावर चर्चा व निर्णय.

धन्यवाद

धन्यवाद

दिलीप कुंभोजकर
प्रधान कार्यवाह

**संलग्न: वरील प्रमाणे**

प्रधान कार्यवाह संपर्क : 'शाकंभरी', 19, सुधा विहार कॉलोनी, रामपूर, जबलपूर (म.प्र.) 482008,
मोबाईल : 9479639831, दूरध्वनी : 0761-2666253, ईमेल : dilipkumbhojkar@bmmindia.org.in
मंडळ संपर्क : 10056, मुलतानी ढान्ढा, गल्ली नं. 2, पहाड़गंज, नवी दिल्ली - 110055

**विशेष सूचना:**

1. सभासदांनी नोंद घ्यावी कि प्रमुख पाहुणे यांनी दिलेली वेळ आणि इंदोर येथे लागू कोरोना संबंधी निर्बंध आणि प्राप्त शासकीय अनुमतीच्या आधारावर बैठकीचा दिवस/वेळ आणि स्थान ह्यात परिवर्तन केले जाऊ शकेल ज्याची सूचना www.bmmindia.org.in इंटरनेट संकेत स्थळ वर अथवा अन्य माध्यमातून दिली जाईल व अधिवेशन स्थळी सूचना फलकावर प्रदर्शित केली जाईल.
2. बैठकीच्या आधी समस्त दिवंगत सभासदांना श्रद्धांजली दिली जाईल
3. गणपूर्ती अभावी सभा तहकूब झाल्यास ही सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने आयोजित केली जाईल. या साठी गणपूर्ती ची आवश्यकता राहणार नाही
4. मंडळाचे संरक्षक,आजीवन सदस्य तसेच संलग्न संस्थेचे दोन(२) अधिकृतप्रतिनिधी बैठकीस उपस्थित राहू शकतील. बेळगांव येथे संशोधित घटनेच्या विविध कलमांच्या अन्वये हितचिंतक श्रेणीत वर्ग केलेले सभासद बैठकीस उपस्थित राहू शकणार नाहीत तसेच संलग्न संस्थेचे प्रतिनिधी म्हणून देखील त्यांना मान्यता देण्यात येणार नाही (कृपया हितचिंतक सभासदांच्या संदर्भा करीता"वृहन माय मराठी" चा अंक किंवा मंडळाचे इंटरनेट संकेत स्थळ बघावे)
5. सभासदांना आर्थिक विवरण तसेच प्रस्तावित बजेट सबंधी कांही प्रश्न असतील ते लेखी स्वरुपात पोस्टाने अथवा ई मेल ने श्री जी के दातार ह्यांना दिनांक 31/12/2021 पर्यंत पाठवावे त्यांचा पत्ता व ई मेल एड्रेस बृहन माय मराठीच्या ह्या अंकात प्रकाशित केलेला आहे
6. मंडळाच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच कार्य विषयी कांही प्रस्ताव अथवा सूचना असतील त्या श्री दिलीप कुंभोजकर प्रधान कार्यवाह ह्यांचा कडे दिनांक 31/12/2021 पर्यंत पाठवावे त्यांचा पत्ता व ई मेल एड्रेस पण बृहन माय मराठीच्या अंकात प्रकाशित केलेला आहे
7. वरीलक्रमांक 5 व 6 प्रमाणे प्राप्त झालेल्या लेखी प्रश्नांची उत्तरे प्रथमतःदिली जातील व तत्पश्चात अध्यक्षांची परवानगी असल्यास ऐनवेळी उपस्थित केलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली जातील. अनुपस्थित सदस्यांच्या लेखी प्रश्नाला विचारार्थ घेतले जाणार नाही.
8. प्रत्येक सदस्याला त्याचा क्रमानुसार प्रश्न विचारण्याची संधी दिली जाईल व त्यावर निर्णय झाल्यावर अन्य प्रश्नकर्ता आमंत्रित केला जाईल ह्याची नोंद सर्वांनी घ्यावी . तसेच सदस्यांनी बृहन माय मराठी चा अंक बैठकीस येताना जरूर आणावा
9. संलग्न संस्थाच्या दोन (2) अधिकृत प्रतिनिधींना वार्षिक सर्वसाधारण सभेला उपस्थित राहता येईल त्या साठी बृहन माय मराठी च्या अंकात प्रकाशित अधिकृत प्रतिनिधी पत्र भरून संस्थेच्या अध्यक्ष,सचिव ह्यांचा सही व शिक्या सह आणावे लागेल. तसेच सर्व सदस्यांना मंडळाने जारी केलेले परिचय पत्र किंवा आधार कार्ड किंवा तत्सम अन्य कोणतेही सरकारमान्य फोटोयुक्त ओळखपत्र आणणे बंधनकारक राहील. या संबंधित अधिक माहिती करिता अधिकृत इंटरनेट संकेतस्थळ www.bmmindia.org.in यावर घटना आणि निवडणूक संहितेचा संदर्भ घ्यावा.
10. बैठक स्थळी प्रवेश करताना आपले ओळख पत्र दाखवून उपस्थिती रजिस्टर मध्ये हस्ताक्षर करणे सर्वांना बंधनकारक राहील .

---oOo--

दिलीप कुंभोजकर
प्रधान कार्यवाह

दिनांक: 02-12-2021

स्थळ : जबलपूर